# नियमित दिवाणी दावा क्रमांक २७७/२०२१ मधील नि.क्र.२९ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दिलेला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार, वादी क्र. १ महिपती दादू उबाळे हे दिनांक ०३.१२.२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचा मुलगा वादी क्र. २ संजय महिपती उबाळे दाव्याचे कामी सामील आहे. वादी नं. १ चे वारस नव्याने रेकॉर्डवर आणण्याची गरज नाही. वादी नं. २ ला सदरचा दावा पुढे चालविण्याचा हक्क आहे. सबब, वादीची विनंती आहे की, वादी नं. १ चे नावास कंस करण्यात येऊन त्यापुढे ''कायदेशीर प्रतिनिधी नं. २'' असे लिहिण्यात येऊन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

२. प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन हरकत घेतली.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने मागणी केल्यानुसार दुरुस्ती होऊन मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत मुळ दावा हा वादी व प्रतिवादी यांचे घर मिळकत नं. ४०६ च्या उत्तरेला असणारे समाईक ६ फूट बोळामध्ये प्रतिवादी यांनी वादी यांना जाण्यायेण्यास हरकत अडथळा करु नये व निरंतरची ताकीदिसाठी दाखल आहे. वादी क्र. २ वादी क्र. १ महिपती दादू उबाळे हे दिनांक ०३.१२.२०२४ रोजी मयत झाल्याने दाव्याचे सरनाम्यामध्ये त्याप्रमाणे दुरुस्तीची परवानगी मागितली आहे. वादी क्र. १ चे वारस वादी क्र. २ असून ते यापूर्वीचे अभिलेखावर आहेत. त्यामुळे वादी क्र. १ चे नावाला कंस करुन त्यापुढे 'कायदेशीर प्रतिनिधी २' अशी दुरुस्ती करुन मागितली आहे.

५. दाव्याचे स्वरुप पाहता वादींनी मागणी केलेली दुरुस्ती रेकॉर्डवर घेणे योग्य व कायदेशीर आहे. सदर दुरुस्तीने दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्ज नि. २९ मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी सदर दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादींनी योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

VAIBHAV BAJRANG GHADAGE

Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.07.07 17:08:11 +0530

**( व्ही. बी. घाडगे )**

दिनांकः- ०७.०७.२०२५

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.